# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २२१/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. अंकुर प्रभाकर पाटील**

**विरुद्ध**

**१. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय-१)**
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटजवळ,
मुंबई -४०० ००१.

**२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
कक्ष-३, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटजवळ,
मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-१)**
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटजवळ,
मुंबई -४०० ००१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०१.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०८.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेशीत केले होते:-

"अपिलार्थी श्री. अंकुर प्रभाकर पाटील यांनी अपिल अर्जामध्ये दि. ३१.०५.२०१९ पर्यंत किंवा त्यापूर्वी मुंबईतील ज्या निःशस्त्र पोलीस उप निरीक्षक, निःशस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक व निःशस्त्र पोलीस निरीक्षकांनी सध्या कार्यरत असलेल्या घटकांमध्ये विविध पदांवर सलगपणे म्हणजे मुंबई आयुक्तालयात ०८ वर्षे कर्तव्य बजावले आहे, असे बदलीपात्र अधिकाऱ्यांचे नांव, पदनाम, सध्याचे नेमणूकीचे ठिकाण, मुंबई क्षेत्रात सलग सेवेचा कालावधी इत्यादि माहितीची मागणी केली आहे. सदर जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (मुख्या-१) व कक्ष ३ (वरिष्ठ आस्थापना) यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात यावी. सबब अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.

२. तक्रारकर्ता यांनी उक्त प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार माहिती मिळालेली नाही म्हणून आयोगाकडे दि. २३.०६.२०२१ रोजी तक्रार दाखल केली. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. २४.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी

..२/-

तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्या- १), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्या- १), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, मुंबई यांच्याकडून आयोगास दि. १४.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी यापूर्वी आयोगास सादर केलेला दि. १४.०६.२०२२ रोजीचा अहवाल आयोगाच्या निदर्शनास आणून नमुद केले की, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मुख्यालय-१ यांनी दि. १६.०९.२०१९ रोजीचे पत्रान्वये संबंधित कक्षास कक्ष ३ (वरिष्ठ आस्थापना) कक्षास कळविले. दि. १३.०२.२०२० अन्वये संबंधित कक्ष कक्ष-३ (वरिष्ठ आस्थापना) कक्षाकडुन माहिती प्राप्त झाली. दि. २०.०२.२०२० रोजी तक्रारकर्त्यास माहिती पुरविणेबाबतचे पत्र तयार करण्यात आले. श्री. अंकुर प्रभाकर पाटील यांचे या कार्यालयातील माहिती अधिकार नस्तीवर नमूद केले आहे की, दि. २४.०२.२०२० रोजी दुपारी १२.४१ वा. तक्रारकर्त्यास फोन केला असता फोन बंद आहे. दि. १३.०६.२०२२ रोजी तक्रारकर्त्यास दोन पैकी एका नंबरवर फोन केला असता फोन बंद लागला व दुसऱ्या क्रमांकावर फोन लावला असता फोन लागला. तक्रारकर्त्याने माहिती टपालाने पाठविणेबाबत कळविल्याने त्यांनी अपिलातील मागणी केलेली माहिती रजिस्टर पोस्टाद्वारे दि. १३.०६.२०२२ रोजी पाठविण्यात आलेली आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सादर केले की, तक्रारकर्ता यांनी विचारलेली माहिती कार्यासनाच्या अभिलेखावर संकलित स्वरुपात उपलब्ध नसल्याने सर्व माहिती संकलित करावी लागल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जरी सदरची माहिती देण्याचे आदेशित केले तरी माहिती उपलब्ध करुन देण्यास कालावधी लागला. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे दि. १३.०६.२०२२ रोजी तक्रारकर्ता यांना माहिती पाठविण्यात आलेली आहे.

५. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश.**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १५.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**